सकाळ : पुणे जिल्हा
सोमवार, २७ सप्टेंबर २०१०



# स्पर्धात्मक आव्हाने स्वीकारा

## पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शेवगावकर यांचे बारामतीत प्रतिपादन

**बारामती, ता. २६ :** ''विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे विद्यार्थ्यांच्या विचारांमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षणामध्ये कोणतीही तडजोड न करता स्पर्धात्मक आव्हाने स्वीकारली पाहिजेत'' असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर यांनी येथे व्यक्त केले.

विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा प्रारंभ डॉ. शेवगावकर यांनी केला. या निमित्ताने त्यांनी येथील गदिमा सभागृहात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संस्थेचे सचिव द. रा. उंडे, एकनाथ जाधव, डॉ. सयाजीराव भोसले, प्राचार्य डॉ. अरुण अडसूळ, डॉ. शंकर देवसरकर, डॉ. संगीता गायकवाड, डॉ. सुषमा चाफळकर, डॉ. अमोल गोजे आदी उपस्थित होते.



**बारामती : येथील गदिमा सभागृहात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर.**

डॉ. शेवगावकर पुढे म्हणाले की, प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण व संशोधनासाठी पोषक वातावरण असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध स्रोतांचा ज्ञानवृद्धीसाठी वापर करावा त्याचप्रमाणे मिळालेल्या ज्ञानाचा पदवी शिक्षणापुरते विद्यार्थ्यांनी मर्यादित न राहता त्याचा वापर संशोधनासाठी करावा. यापुढील काळात मिळणारे शिक्षण हे संशोधनाभिमुख असले पाहिजे यावर विद्यार्थ्यांचा व महाविद्यालयांचाही कटाक्ष असला पाहिजे. प्राचार्य डॉ. अडसूळ यांनीही या प्रसंगी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी कुलगुरूंच्या हस्ते महाविद्यालयाच्या विद्यादीप या नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.

या प्रसंगी विद्या प्रतिष्ठानच्या विविध शाखांतील विद्यावाचस्पती पदवी मिळविलेल्या प्राध्यापकांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यामध्ये कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. श्यामराव वाघ, मराठी विभागप्रमुख डॉ. श्रीराम गडकर, डॉ. आनंदा गांगुर्डे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या डॉ. रेखा अवघडे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. अविनाश कोळेकर यांचा यामध्ये समावेश होता.

नाशिकच्या लोकरंजन कला मंडळाचा छत्रपती शाहू महाराज आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. विजय काकडे यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला. प्रा. जयश्री बागवडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुषमा चाफळकर यांनी आभार मानले.